विश्वशांती प्रस्थापनेमध्ये इस्लामची भूमिका

अम्लान दत्त
(अनुवाद : वीणा आलासे)

मी मुसलमान नाही. इस्लाम धर्मासंबंधी माझं काही अज्ञान असू शकतं; पण सहानुभूती कमी नाही. आज सगळीकडे ज्ञान व सहानुभूती, दोहोंचाही अभाव फार जाणवतो; आणि निरपेक्ष चिंतन तर दिसतच नाही. म्हणूनच मोकळेपणी काही लिहिण्याचे हे धाडस. आणखी एक गोष्ट सुरुवातीलाच नम्रपणे नमूद करून ठेवतो की, महंमद यांच्या नावाबरोबर मी नेहमीच रसूल, नबी अथवा पैगंबर या पदव्या जोडत नाही ते अनादरामुळे नव्हे. गांधी अथवा रवींद्रनाथ यांच्या नावाशीही मी साधारणपणे महात्मा अथवा गुरुदेव जोडत नाही तेही अनादरामुळे नव्हे. हे सारेच आदरणीय आहेत. पण मला माणूस म्हणून त्यांचे अस्तित्व प्रकर्षाने जाणवते. महंमदही माणूसच होते.

– १ –

गेल्या पाचशे वर्षांच्या इतिहासावर प्रामुख्याने पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव आहे असे मानले जाते. (सुरुवातीला हा प्रभाव तितकासा स्पष्ट नव्हता.) तर त्यापूर्वी पाचशे वर्षांहूनही अधिक काळ इस्लामी संस्कृती अग्रगण्य मानली जात होती असे म्हणायला वाव आहे. त्या काळात आणखीही काही साम्राज्ये व राज्यशक्ती होत्या, पण तरीही इतिहासाच्या महानभोमंडळात इस्लाम तेजःपुंज नक्षत्रासारखा उठून दिसतो. मानवी संस्कृतीच्या समग्र विवेचनात आठव्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंतच्या काळातील इस्लामचा वाटा कोणीही प्रामाणिक इतिहासकार कमी लेखू शकणार नाही. आठव्या शतकानंतर बराच काळ बगदाद हे संस्कृतीचे सर्वांत उल्लेखनीय केंद्र होते. तत्त्वज्ञान, कला, नाना विद्या व इतर सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये प्रतिभावान मुसलमान विचारवंत सगळीकडे पसरलेले होते. केवळ इराणमध्येच नव्हे, तर चीनपासून स्पेनपर्यंत त्या काळच्या एका विशाल भूखंडावर त्यांचा वावर होता.

या युगातल्या अखेरच्या काळातील दोन घटना विशेष स्मरणीय आहेत. तेराव्या शतकात एक मोठी अश्वारोही भटकी जमात चंगीजखानाच्या नेतृत्वाखाली मंगोलियापासून रशियापर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशात धुमाकूळ घालत होती. या उग्र जमातीच्या आक्रमणामुळे तत्कालीन चमकदार नागरी संस्कृती संपूर्णपणे अस्ताव्यस्त होऊन गेली. काही काळ तर आता मानवी संस्कृतीचा सर्वनाश होणार, असे वाटू लागले. चंगीजखानाच्या मृत्यूनंतर विशाल तातार (Tatar) साम्राज्य त्याच्या नातवंडांमध्ये विभाजित झाले. ही विजयी जमात लवकरच इस्लामकडे आकृष्ट झाली. त्यांच्यातून नवे विद्वान व कवी निर्माण झाले आणि नवीन संस्कृती विकसित होऊ लागली. या भटक्या व रानटी मंगोलियन व तातार जमातीला सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यात इस्लामची फार महत्त्वाची भूमिका होती, असे मुसलमान इतिहासकार मानतात.

आता दुसरी घटना. आधुनिक युगाच्या प्रारंभी युरोपात जी रेनेसांसची चळवळ उदयाला आली त्यातील एक प्रमुख बाब म्हणजे प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानाचे पुनरुज्जीवन. पण मध्ययुगीन पाश्चात्त्य समाजामध्ये या ग्रीक सांस्कृतिक संचिताचे संरक्षण करण्याइतकी शक्ती नव्हती. त्या काळात प्राचीन ग्रीक विचारधारांपैकी एका प्रमुख धारेचे संरक्षण व पालनपोषण सॅरासेन मुसलमान विद्वानांनी केले. नवीन युरोपने प्राचीन ग्रीक परंपरेचे संचित प्राधान्याने त्यांच्याकडूनच घेतले. म्हणजेच, अशा प्रकारे इस्लामी संस्कृतीने, स्वतःच्या दिव्यातील तेल संपत आलेले असतानाही, एका ऐतिहासिक संधिक्षणावर प्राचीन ज्ञानाची ज्योत पाश्चात्त्यांच्या हाती दिली.

'रोमन साम्राज्याचा उदयास्त' या विषयावर पुष्कळ संशोधन झाले आहे. पण इस्लामचा विस्तार व संकोच, विकास व क्षय आणखीन आश्चर्यकारक व मनात खळबळ माजवणारा आहे. आज या क्षणी आपल्याला त्यापासून पुष्कळच शिकण्यासारखे आहे. या इतिहासाकडे काळजीपूर्वक वळून बघणे ही आजच्या काळाची फार महत्त्वाची गरज आहे. याबाबतची चर्चा सावकाश केली जाईलच, पण त्यापूर्वी इस्लामच्या मूलभूत आदर्शांबाबत काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे.

– २ –

एकीकडे कुटुंब, वासस्थान व जातजमात आणि दुसरीकडे व्यापार : माणसांमध्ये जे सामाजिक व सांस्कृतिक आदर्श आढळतात त्यांच्या मुळात जायचे म्हटले तर अपरिहार्यपणे या दोन बाबींपाशी

अनुक्रमणिका

येऊन पोहोचावे लागते. जातजमातीच्या वर्तुळात एकप्रकारचे आदिम साम्य व ऐक्य दिसून येते, एकमेकांवद्दल सहजपणे सहानुभूती व आपलेपणा निर्माण होताना दिसतो. अर्थात यावरोबरच तेथे संकुचितपणा, अंधविश्वास, पोटजातींमध्ये पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले वैर, सूडभाव आणि विलक्षण आक्रमकताही असते. व्यापारामुळे माणूस जातीजमातीच्या वर्तुळाबाहेर जातो, त्याला बाहेरच्या जगाची जाणीव होते. त्यामुळे मन आपोआपच काही प्रमाणात तर्कप्रामाण्याकडे व हिशेबीपणाकडे झुकते. यातही बऱ्या व वाईट दोन्ही बाजू असतात. जातीजमातीच्या वातावरणातील साम्य व ऐक्य आणि व्यापारउदिमाच्या वातावरणातील स्वातंत्र्य व विश्वजाणीव इत्यादी परस्परपूरक गोष्टींच्या संयोगाने जी संस्कृती निर्माण होते ती काही मूलभूत आदर्शांच्या अथवा जीवनमूल्यांच्या आधारावर. आणि मूल्यांशी व्यक्तीच्या आत्मवळाचे मिलन व्हावे लागते, कारण आत्मशक्तीशिवाय धार्मिक जाणीव परिपूर्ण होऊ शकत नाही.

महंमद यांचा जन्म मक्का येथे इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या अखेरीस कुरेश नावाच्या अरबी जातीतल्या एका खानदानी कुटुंबात झाला. अगदी लहानपणीच पितृहीन झालेला हा बालक निरक्षर होता म्हणतात. स्वतःच्या जमातीवर त्याचे प्रेम होते, पण कुरेश जातीच्या बहुतांश माणसांचा धार्मिक विश्वास त्याला मानवणारा नव्हता. त्या काळी मक्का हे शहर एका महत्त्वाच्या व्यापारी मार्गावर वसलेले होते. त्यामुळे लहानपणापासूनच या मुलाचे व्यापाराच्या निमित्ताने भ्रमण सुरू झाले. अशाच एका प्रवासात पितृतुल्य आबू तालिब यांचेबरोबर तो पहिल्यांदा सिरियाला गेला. पंचविसाव्या वर्षी त्याचा विवाह झाला. पत्नी खादिजा ही श्रीमंत व्यापारी परिवारातली मुलगी होती. हा व्यावसायिक संबंधही कमी महत्त्वाचा नाही. व्यावसायिक कामकाजासाठी प्रवास करताना युवक महंमद जसा जातजमातीच्या व विशिष्ट वासस्थानाच्या सीमेबाहेर गेला तसेच त्याची दृष्टी तत्कालीन ख्रिश्चन व यहुदी या दोन महत्त्वाच्या धर्मांकडे वळली आणि या धर्मांसंबंधीचे त्याचे ज्ञान अधिकाधिक सखोल होऊ लागले. धर्मजिज्ञासा तीव्र झाली. कित्येक वर्षे वर्षातला विशिष्ट काळ हा युवक एकांतात व धर्मचिंतनात व्यतीत करू लागला.

शेवटी जेव्हा त्याला दिव्यदृष्टी प्राप्त झाली वा अल्लाह्‌ची वाणी त्याच्या हृदयात झंकारते आहे असे वाटून त्या भावनेने तो भारून गेला, तेव्हा त्याचे वय चाळीस वर्षे होते. त्यानंतर महंमद तेवीस वर्षे जगले. पहिली तेरा वर्षे त्यांनी मक्केतच त्या दिव्य वाणीचा प्रचार केला. विरोध होत होता, नाना अत्याचारही सहन करावे लागत होते, पण प्रचारही सुरूच होता. अशा वेळी महंमद यांना मदिनेहून निमंत्रण आले आणि त्यांच्या आयुष्याची अखेरची दहा वर्षे मदिना येथे गेली. या दहा वर्षांत त्यांना असामान्य यश व सत्ता लाभली. जगातील कुठल्याही धर्मगुरूला स्वतःच्या हयातीत इतके यश मिळाले की नाही हे सांगणे कठीण आहे. महंमद यांच्या मृत्यूनंतर त्यांची वाणी विलक्षण वेगाने फारच थोड्या काळात दूरवर पसरली.

इस्लामचे स्थान प्राचीन यहुदी व ख्रिश्चन धर्मांच्या परंपरेतच बसणारे आहे. पण त्याबरोबरच स्वतःची अशी काही खास वैशिष्ट्येही आहेत. पहिले उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे इस्लाम हा एक सर्व मानवांना सामावून घेणारा धर्म आहे. यहुदी धर्मात इतकी सर्वसमावेशकता नाही. ईश्वराने अथवा जेहोवाह्‌ने स्वेच्छेने निवडलेला एक विशिष्ट जनसमूह म्हणजे यहुदी धर्मसमूह. इस्लाम अशा प्रकारच्या कुठल्याही स्थानीय अथवा राष्ट्रीय सीमेत आबद्ध नाही. अल्लाह्‌ची वाणी कुठल्याही राष्ट्रातील सर्व माणसांसाठी आहे. जो कोणी ती वाणी ग्रहण करू इच्छील त्या प्रत्येकासाठी ती उपलब्ध आहे. याअर्थी इस्लाम हा एक सर्वसमावेशक धर्म होय.

कुराणात सांगितले आहे की, सर्व माणसांची जात एकच. एकाच आदि-मातापित्यापासून सर्वांची उत्पत्ती झाली आहे. त्यानंतर ही एकच मनुष्यजात हळूहळू अनेक समूहांमध्ये विभक्त झाली. प्रत्येक मानवसमूहासाठी अल्लाह्‌ने त्याचे संदेशवाहक दूत पाठवले आहेत (सुराह्‌ ३५/आया २४).* ईश्वराचे हे सर्वच दूत आदरणीय आहेत. फक्त महंमदानेच मानवाला मुक्तीचा मार्ग दाखवला असे इस्लाम म्हणत नाही. उलट, ईश्वराच्या सर्व दूतांनी मुक्तीचा मार्ग दाखवला आहे असे म्हणतो. ईश्वर वा अल्लाह्‌च्या वाणीवर विश्वास ठेवणे हाच मुक्तीचा मार्ग होय, असा सखोल व गंभीर विश्वास केवळ स्वतःच्या इच्छेनेच निर्माण होऊ शकतो; हे जोरजबरीचे काम नव्हे. कुराणात म्हटले आहे, 'ला इकराह्‌ फिद्दीन', म्हणजेच धर्माच्या बाबतीत जोरजबरदस्ती चालणार नाही (सुराह्‌ २/आया २५९).

इस्लामचे आणखी एक वैशिष्ट्य हे की, या धर्मात सामाजिक साम्याचा अतिशय स्पष्टपणे व जोरदारपणे उच्चार करण्यात आला आहे. तात्त्विक अर्थाने साम्य बऱ्याच धर्मांमध्ये सांगितलेले आढळते पण गुलामांशीही समभावाने वर्तणूक करण्याची बात महंमद ज्या भाषेत सांगतात ती भाषा लक्षणीय आहे. ते म्हणतात,

* संपूर्ण कुराण शंभराहून अधिक सुराह्‌ अथवा अध्यायांत विभागलेले आहे आणि प्रत्येक सुराह्‌मध्ये अनेक आयात अथवा वचने आहेत.

अनुक्रमणिका

'तुम्ही स्वतः जे अन्न ग्रहण कराल तेच गुलामालाही द्यावे. स्वतः जसे वस्त्र वापराल तसेच वस्त्र गुलामालाही द्यावे. एक गोष्ट नेहमी ध्यानात ठेवावी की, मुसलमान म्हणजेच मुसलमानाचा भाऊ.' आपल्या देशात अद्वैतवादाबरोबर अस्पृश्यताही समांतर चालते. आणि या दोहोंमध्ये जी तात्त्विक विसंगती आहे ती बहुतेक उच्चवर्णीय हिंदूंना त्रासदायक वाटत नाही. महंमदांनी ज्या भाषेत साम्यतत्त्व मांडले आहे त्यात अशी विसंगती नाही. अर्थात मुस्लिम समाजातही गरीब-श्रीमंतांमधला भेदभाव आहेच. 'अशरफ' व 'अतरफ' म्हणजे खानदानी व अंत्यज हा भेद बांगला देशमधील मुसलमानांमध्ये स्पष्टपणे दिसून येतो. पण महंमदांनी त्या काळी सामाजिक साम्याचा उल्लेख ज्या प्रकारे केला ते इस्लामचे एक वैशिष्ट्य आहे ही गोष्ट मान्य करणे भाग आहे. महंमदांच्या काही समकालीन अनुयायांनीही आपल्या दैनंदिन जीवनात महंमदांची ही शिकवण शक्य तितकी अमलात आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतरच्या काळात खानदानी मुसलमानांचा कल साध्या राहणीकडे राहिला नाही हे खरे; पण हिंदू समाजात असाम्याला अथवा विषमतेला जसा शास्त्रीय आधार देण्यात आला होता आणि कर्मठ आचरणाद्वारा उच्चनीचभेद राखण्यात आला होता तसे मुस्लिम समाजात झाले नाही. विशेषतः गुलामांशी कशी वागणूक असावी याबाबत इस्लामी परंपरेत जे दाखले मिळतात तसे जगात इतरत्र कुठेही सापडणे फार कठीण आहे. आज काळे व गोरे यांच्यातील परस्परद्वेषाने ग्रासलेल्या जगात ही गोष्ट क्षुल्लक ठरत नाही.

सामाजिक साम्य आणि आर्थिक साम्य या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. या युगातील क्रांतिकारक साम्यवाद्यांनी आर्थिक साम्याचे तत्त्व ज्या प्रकारे मांडले तसे महंमदांनी मांडले नाही. त्यांनी औदार्य व दानशूरतेवर भर दिला. त्यांच्या म्हणण्यानुसार काही विशेष प्रसंगीच दान करणे पुरेसे नाही. महंमदांच्या वाणीचा भावार्थ असा की, सन्मार्गाने पैसा मिळवण्यात काही गैर नाही, पण गरजेपेक्षा जास्त मिळेल ते दान करून टाकणे उत्तम. कारण त्यामुळे असहाय गोरगरिबांचे दुःख दूर होऊ शकते. आणि हे दान जितके निःशब्दपणे करता येईल, दाता जितका जास्त निःस्वार्थी व प्रसिद्धिपराङ्मुख असेल तितका तो अल्लाह्ला प्रिय होईल. न्यायाच्या बाबतीत कोणीही माणूस मालिक होऊ शकत नाही, मालिक फक्त अल्लाह्.

इस्लामचे आणखी एक वैशिष्ट्य बघूया. त्या काळच्या यहुदी व ख्रिश्चन धर्मांच्या तुलनेत इस्लाम हा जास्त बुद्धिप्रामाण्यवादी धर्म होता. येशू ख्रिस्त हा ईश्वराचा पुत्र, अगदी एकुलता एक पुत्र, हा विश्वास महंमदांना तर्कसंगत वाटला नाही. म्हणजे असे नव्हे की, जर येशू ईश्वरपुत्र होऊ शकतो तर महंमद का नाही, असे त्यांना म्हणायचे होते. उलट, त्यांचे म्हणणे असे होते की, प्रत्यक्षपणे कोणीही ईश्वरपुत्र असू शकत नाही आणि म्हणून कोणीही असा दावा करणे तर्कसंगत ठरत नाही. काही विशिष्ट माणसे ईश्वराचे दूत असू शकतात, संदेशवाहक असू शकतात; आणि असे दूत अथवा पैगंबर एकच नव्हे तर अनेक आहेत. आपल्याला माहीत नसलेलेही (म्हणजे बायबलमधील यादीत जे आहेत त्या व्यतिरिक्तही) आणखी अनेक दूत आहेत.

प्राचीन पैगंबरांच्या बाबतीत असे सांगितले जाते की, अनेक अलौकिक चमत्कारांद्वारा ते ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करून दाखवीत असत. इतकेच नव्हे तर ते स्वतः ईश्वरानेच पाठवलेले दूत आहेत हेही सिद्ध करून दाखवत असत. हजरत महंमद यांना असे काही अलौकिक पुरावे देण्याची गरज भासली नाही. त्यांचे म्हणणे असे की, आपल्या डोळ्यांसमोर असलेले हे सूर्य-चंद्र-ग्रह-तारकामय विश्व, ही जीवन-मृत्यूची परिक्रमा, मानवी जाणीवेचे विलक्षण वैभव यातच अल्लाह्च्या अस्तित्वाचे पुरावे व महिमा भरलेला आहे. आणि यापासूनच आपल्याला पुष्कळ काही शिकायला मिळू शकते. एकमेवाद्वितीय परमेश्वरावर एकनिष्ठपणे विश्वास ठेवणे हेच इस्लामचे मूलभूत तत्त्व असले तरीही, त्याबरोबरच माणसाची बुद्धी व तर्कशक्ती हीदेखील ईश्वरदत्त होय असे मानले जाते. महंमद स्वतः आपल्या शिष्यांना सांगतात की, जीवनातल्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडताना कुराण व पैगंबराचा उपदेश पाळूनही गरजेप्रमाणे स्वतःची बुद्धी व तर्कशक्ती वापरून चालावे. या वैचित्र्यपूर्ण व परिवर्तनशील जगात हे इतके स्वातंत्र्य नसले तर पाऊल टाकणेच शक्य नाही. या संदर्भातला येमेनमधील मूयाज व महंमद यांचा प्रश्नोत्तरात्मक संवाद अनेकांना माहीत असेल. इस्लामी राज्य जसजसे विस्तारत गेले तसतसे दूरवरच्या राज्यकर्त्यांनी व न्यायदात्यांनी आपापल्या विवेकबुद्धीनुसार चालण्याचे स्वातंत्र्य घेतले पाहिजे अशी अनुमती देण्याखेरीज काही उपाय नव्हता.

हजरत महंमद हे ईश्वराचे अखेरचे नबी होते असे म्हटले जाते. हे विधान जरा हटवादी वाटू शकते. रवींद्रनाथ म्हणतात, 'शेष नाही जे, शेषकथा के बोलबे?' शेवटचा नबी कोण ते कोण सांगू शकणार? पण हे विधान एका वेगळ्या अर्थानेही घेता येऊ शकते. महंमदांना त्यांचा इस्लाम धर्म तर्कप्रामाण्याचे युग सुरू होण्याच्या सीमेवर प्रतिष्ठित करायचा होता. अर्थ हा की, भविष्यात कोणीही नबी होण्याची आवश्यकता नाही. गृहीत आध्यात्मिक तत्त्वे आणि तर्कप्रामाण्य या दोहोंचा संयोग साधूनच मानवाला पुढची वाटचाल करावी लागणार.

– ३ –

इतिहासातल्या अन्य अनेक धर्मप्रचारकांमध्ये व महंमदांमध्ये एक मोठा फरक आहे. बुद्ध अथवा येशू यांना राज्यकारभार चालवावा लागला नाही. मदिनेला गेल्यावर महंमदांवर ही जबावदारी येऊन पडली. ज्या सर्व गोष्टी एक धर्मप्रचारक बोलू शकतो तसा एक राष्ट्रनेता बोलू शकत नाही. उदाहरणार्थ, प्रेम अथवा अहिंसा. येशू ख्रिस्त अथवा श्रीचैतन्य ज्या भाषेत प्रेमाची महती सांगतात त्या भाषेत कोणी राष्ट्रनेता बोलू शकेल काय? शत्रूचे आक्रमण झाले असता कोणीही राजा म्हणू शकेल काय की स्वतःवर प्रहार झाला तरी प्रतिप्रहार करू नका?

कोणी वाद उपस्थित करू शकतील की, असे जर आहे तर मग महंमदांनी राष्ट्राचा राज्यकारभार हाती घ्यावाच कशाला? येथे मी ऐतिहासिक घटनांच्या जटिलतेत न शिरता एका मूलभूत प्रश्नाकडे दृष्टी आकर्षित करू इच्छितो. महंमद असे मानत असत की, धर्माचे सत्य जीवनाच्या एखाद्या कोपऱ्यात कोंडून ठेवणे योग्य नव्हे. धर्म जर सत्य असेल तर तो जीवनाच्या सर्व क्षेत्रांना मार्गदर्शक ठरला पाहिजे. व्यक्तिगत जीवनात धार्मिकता व आर्थिक आणि राजकीय कामकाजात अधार्मिकता, असे जर आपण वागू लागलो तर धर्माला फारसे मोल उरत नाही. असे झाले तर धर्म सर्वच क्षेत्रांमधून हळूहळू हद्दपार होईल. अल्लाह् जर विश्वविधाता असेल तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्याचा आदेश लागू पडला पाहिजे. महंमदांना असे वाटणे स्वाभाविक होते; कारण त्यांच्या धर्मविश्वासावर जेव्हा चहूकडून आक्रमण होत होते त्या वेळी स्वतःचे रक्षण करणे ही त्यांच्या अनुयायांची गरज होती. कारण ते सुरक्षित राहिले नाहीत तर इस्लामचे संरक्षण शक्य नव्हते. इस्लामच्या जन्ममुहूर्तावरच ही अशी परिस्थिती उद्‌भवली होती. महंमद या परिस्थितीला मध्यवर्ती ठेवूनच बोलत होते. त्यांची वचने नीट समजून घ्यायची असतील तर ही पार्श्वभूमी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आयुष्याच्या शेवटच्या दहा वर्षांत तर त्यांच्या रूपाने असा एक माणूस बोलत होता जो की एकाच वेळी धर्मगुरू, न्यायदाता, योद्धा व राष्ट्रनेता होता. अशा परिस्थितीत त्यांच्या प्रत्येक कृतीचा सारासार विचार करण्याइतके तपशील माझ्याजवळ नाहीत. पण मूलभूत नीतितत्त्वांचा अर्थ समजण्याचा प्रयत्न करणे पुरेसे आहे.

महंमद म्हणत, 'तुमचा धर्म तुमचा आणि दुसऱ्याचा धर्म दुसऱ्याचा' (१०९/६); दुसऱ्यांवर जोरजबरदस्तीने स्वतःचा धर्म लादणे अयोग्य होय. पण तुमच्या धर्मावर जर आक्रमण झाले तर मात्र सर्वशक्तीनिशी ते आक्रमण परतवून लावणे हे तुमचे कर्तव्य आहे. या विधानासोबत लगेच स्पष्ट पुस्ती जोडलेली आहे की, 'आपण प्रथम आक्रमण करू नये. आक्रमण करणारे अल्लाह्‌ला अप्रिय होतात' (२/१९०). आत्मसंरक्षणार्थ हिंसेचा मार्ग अनुसरण्यास महंमदांचा विरोध नव्हता. त्यांच्या भक्तांना फार अत्याचार सहन करावे लागले होते हेही विसरता कामा नये. शांतता आणि सहिष्णुता हेच महंमदांचे उद्देश होते. नवीन धर्माच्या संरक्षणासाठीच त्यांनी शांततेची व सहिष्णुतेची मागणी केली होती.

रणांगणावरील हिंसक वातावरणात मर्यादा पाळणे फार कठीण असते. ज्या युद्धांमध्ये महंमदांनी स्वतः नेतृत्व केले त्यांतही हिंसेच्या स्वभावानुसार काही बाबतीत मर्यादेचे उल्लंघन होणे शक्य आहे. काही अमर्याद वचनेही उच्चारित होऊ शकतात. याबाबतीत मतभेद होऊ शकतो. पण महंमदांनी ऐन युद्धामध्ये संयमाचे व क्षमेचे असे काही आदर्श नमुने दाखवून दिले आहेत की आश्चर्य वाटावे. मृत्यूच्या तीन वर्षे आधी खैबर येथे यहुदींविरुद्ध एका युद्धात महंमदांनी स्वतः नेतृत्व केले व विजय मिळवला. तेथे एका यहुदी रमणीने पैगंबरांना विषमिश्रित भोजन वाढले. महंमदांचे एक साथी ते भोजन ग्रहण करताच मरण पावले. महंमद एक घास तोंडात घेताच सावध झाले आणि त्यांनी घास थुंकून टाकला. परंतु तेवढ्या विषस्पर्शानेही त्यांची प्रकृती बिघडली. अखेर त्याच कारणामुळे झालेल्या आजारात त्यांचा मृत्यू झाला असेही मानले जाते. ते काहीही असो; पण महत्त्वाची गोष्ट ही की, त्या यहुदी रमणीला महंमदांसमोर उपस्थित करण्यात आले. त्या रमणीने त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, स्वतःच्या जमातीचा अपमान सहन न झाल्यामुळे तिने हे कृत्य केले. महंमदांनी तिला क्षमा केली. त्यांच्या मते रागाच्या भरात एखादे कृत्य करणे हे धर्मविरुद्धच होते, पण तरीही धर्मरक्षणार्थ गरज पडल्यास संग्राम करण्यास ते तयार असत.

जेहाद या विषयावर पुष्कळ चर्चा आणि वादविवाद झाले आहेत. धर्मासाठी जे युद्ध त्याचे नाव जेहाद (अथवा जिहाद). जातजमातनिष्ठ असहिष्णुतेशी जेव्हा धर्मयुद्धातील उन्मादाचा संयोग होतो, तेव्हा परिणाम भयंकरच होणार यात काहीच शंका नाही. पण जेहादचा खरा अर्थ सत्यासाठी संग्राम असा होय. अत्याचारी राज्यशक्ती आणि असत्य यांच्या विरोधात सत्याचा पक्ष घेऊन कायावाचामनेकरून निर्भयपणे साक्ष देण्याची दृढता म्हणजे जेहाद. खान अब्दुल गफ्फार खान जेहाद हा शब्द सत्याग्रह या अर्थी वापरत असत. त्यांनी गांधीजींच्या प्रभावामुळे जेहादचा असा अर्थ घेतला असे म्हणता येऊ शकते. पण ते स्वतः एक श्रद्धावान मुसलमान होते. आणि जेहाद या शब्दाचा फक्त एकच जहालपंथी अर्थ होऊ शकतो असे म्हणणे चूक

ठरेल. सत्य व धर्म यांसाठी करावयाचा संग्राम हा नेहमी हिंसात्मकच असतो असे मानणे योग्य नाही. ट्युनिशियाचे माजी राष्ट्रनेता बूरगिबा हे गांधीवादी अहिंसेवर विश्वास ठेवणारे नव्हते; पण त्यांनीही म्हटले आहे की, स्वतःतील सर्व असाधू प्रवृत्तींविरुद्ध लढा देणे म्हणजेच जेहाद. म्हणजेच, जेहाद या शब्दाशी चित्तशुद्धीचा संबंध आहे. शब्दांचा गैरवापर होऊ शकतो. निरनिराळ्या विपरीत घटनांच्या संदर्भात जेहाद या शब्दाच्या अर्थाचे अधःपतन झाले. मुद्दा हा की, दृढसंकल्प हवा. ज्या अविचारी मूर्खपणामुळे व सूडबुद्धीमुळे संस्कृती खिळखिळी होऊ लागते त्या अनिष्ट प्रवृत्तींपासून दृढसंकल्पांची शक्ती बचावून ठेवणे हेच आजच्या नैतिक संग्रामाचे स्वरूप आहे. महंमदांनाही सत्य, क्षमा व दृढता यांचे संमिश्रणच हवे होते.

– ४ –

महंमदांना जे हवे होते आणि अखेर जे घडले त्यात अंतर असणे स्वाभाविक आहे. माणसाच्या इच्छेनुसार वा हेतूनुसार इतिहासाची गती नियंत्रित होत नसते. सर्व समाजांमध्ये असेच घडलेले दिसते. म्हणूनच नवीन पिढीला नव्याने विचार करावा लागतो. भूतकाळाकडे संपूर्णपणे पाठ न फिरवता विवेकाच्या आधारे सत्याचा पुन्हा एकदा नव्याने शोध घ्यावा लागतो. पण त्यापूर्वी याबाबतीतल्या एका मूलभूत प्रश्नाची चर्चा करणे आवश्यक आहे.

सत्याचे एकाधिक स्तर असतात. या सर्व स्तरांमध्ये काय फरक आहे ते ठरवणे हे विवेकाचे मुख्य काम होय. जशा सुखाच्या निरनिराळ्या पातळ्या असतात, दुःखाच्या असतात; तशाच सत्याच्याही असतात. जसे भगवद्‌गीतेत सांगितले जाते की, माणसाला कर्म करण्याचा अधिकार आहे पण कर्मफळाची आशा धरण्याचा अधिकार नाही. हा सत्याचा एक स्तर झाला. पण त्याचबरोबर सांगण्यात येते की, युद्ध करत रहा; जिंकलास तर राज्यलाभ, हरलास तर स्वर्गलाभ. या ठिकाणी वेगळ्या स्तरावरचा युक्तिवाद आहे. कारण येथे लाभाची म्हणजेच कर्मफळाची आकांक्षा मान्य करण्यात आली आहे. काही अशीही युद्धे असतात की ज्यांत कोणाचाच विजय होणे शक्य नसते, उभयपक्षांचा नाशच होणार असतो. तेव्हा काय? काही वचने स्थळकाळाच्या मर्यादेत सत्य असतात, काही त्यामानाने जास्त स्थळकालातीत असतात. सत्याचे असे निरनिराळे स्तर असतात म्हणूनच धर्मशास्त्रांचाही साक्षेपी पुनर्विचार होणे आवश्यक असते. असा पुनर्विचार अनेक प्रकारे होऊ शकतो. भक्त व अनुयायी यांचा विचार एकप्रकारचा होणार. हे लोक वेद, बायबल व कुराण यांतील सर्वच भाग निर्दोष आहे असे मानून त्यांतील श्लोकांचा अथवा वचनांचा अर्थ लावतात. तिकडे नास्तिक मंडळींचा विचार वेगळ्याच दिशेचा. हे लोक धर्मसंशोधनाच्या नावाखाली धर्मातील सर्वच भाग सदोष आहे असे म्हणून सोडून देतात.

पण या दोन टोकांशिवाय तिसऱ्या प्रकारचा विचार असू शकतो. तेथे धर्माचा सर्वांश ग्रहण करणे किंवा सर्वांश वर्जन करणे असे पवित्रे घेऊन तर्क सुरू होत नाही. सत्याचे अनेक स्तर असतात ही गोष्ट मान्य केली जाते. धर्मग्रंथात जे आहे ते सर्वच सत्य नाही, आणि जे सत्य आहे ते सर्व एकाच स्तरावरील सत्य नाही असे गृहीत धरून विचार सुरू होतो. राममोहन राय हिंदू धर्मग्रंथांतील सर्व सत्य एकाच प्रकारचे आहे असे मानत नव्हते. जेफर्सन यांनी कठोर भूमिका घेऊन त्यांच्या मते बायबलमधील जी सर्वोत्तम तत्त्वे होती ती व जी अविश्वसनीय विलक्षण चमत्कारांवर आधारित नव्हती ती तत्त्वे निवडून काढली होती. धर्माला अंधविश्वासापासून व कर्मठपणापासून मुक्त ठेवण्यासाठी असा अंतर्भेदी विचार व विश्लेषण आवश्यक असते. दुसऱ्यांच्या धर्माबाबत या गोष्टी आपण सारेच मान्य करतो पण स्वतःच्या धर्माचा असा साक्षेपी विचार व विश्लेषण करायची वेळ आली की अनेकांना पेच पडतो. याला एक महत्त्वाचे कारणही आहे.

धार्मिक कडवेपणामुळे एकप्रकारचे अभेद्य ऐक्य निर्माण होते. तर्कसंगत विचार व विश्लेषणामुळे मतभेद संभवतात. कारण सर्वच जण एकाच वेळी एकाच प्रकारे विचार करणे शक्य नसते. वादामुळे भेद निर्माण होतात म्हणूनच बुद्धिप्रामाण्यवादी समाजात परमतसहिष्णुतेची जास्त गरज असते. तर्कप्रामाण्य व सहिष्णुता या हातात हात घालून चालल्या नाहीत तर समाजात अडचणी निर्माण होतात. ऐक्यावर संकट ओढवते. ज्या समाजाला सहिष्णुतेची सवय नसते तो समाज बुद्धीला व तर्काला भितो. हा फार मोठा प्रश्न आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष करून वा त्याला टाळून जाणे शक्य नाही. सर्व समाजांमध्ये कमीअधिक प्रमाणात हा प्रश्न असतोच. यावर सखोल विचार व्हायला हवा. आजच्या मुसलमान समाजापुढे हे एक फार महत्त्वाचे काम आहे.

महंमद एकाच वेळी धर्मगुरू, न्यायदाता व राष्ट्रनेता होते म्हणून त्यांना जीवनाच्या सर्व क्षेत्रांमधील समस्यांवर बोलावे लागले. अशा परिस्थितीत त्यांची सर्वच वचने एकाच पातळीवरील असणे अशक्य आहे. काही गोष्टी मूलभूत व आध्यात्मिक अथवा पारमार्थिक स्तरावरील कालातीत सत्ये असतात. त्याबरोबरच काही गोष्टी व्यावहारिक स्तरावरच्या असतात आणि त्या स्थळकाळानुसार बदलत जातात. दोन्ही प्रकारची उदाहरणे देता

येतील. आध्यात्मिक स्तरावरील एका वचनाचा अरबी भाषेतून उर्दूत केलेला अनुवाद असा : 'जो नफ्ससे बचा लियां गया वह फलाह् पा गया'. दोन मूळ अरबी शब्द जसेच्या तसे ठेवूनच या वचनांचा अनुवाद करण्यात आला आहे. स्वतंत्रपणे आपल्या भाषेत सांगायचे झाल्यास या वचनाचा अर्थ असा : संकुचित अहंपासून ज्याचा उद्धार झाला त्याला परम् प्राती झालीच. अशी वचनै सहजासहजी जीर्ण होऊन जात नाहीत.

पण सर्वच वचने कालोत्तीर्ण होणे शक्य नसते. पूर्वीचे अनेक नियम व कायदे समाजाच्या आणि काळाच्या परिवर्तनाशी मिळतेजुळते करून घ्यावे लागतात. उदाहरणार्थ, स्त्री-पुरुष संबंधाबाबतचे नियम. पूर्वी दीर्घकाळ अशी परिस्थिती होती की, स्त्रियांना स्वतंत्रपणे अर्थार्जन करण्याची सोय फारच कमी असे. म्हणून अपरिहार्यपणे बाई पुरुषावर अवलंबून असे जीवनावश्यक गरजांसाठी. त्या वेळी ही परिस्थिती बदलण्याची अजिबात शक्यता दिसत नव्हती. म्हणूनच या परिस्थितीला अनुसरून काही व्यावहारिक नियम व निर्देश देण्यात आले. कुराणातील बहुविवाह-प्रथेमागेही काही विशेष सामाजिक कारणे होती. 'अल निसा' (नारी) या नावाचा चतुर्थ सुराह् उहूदच्या युद्धाच्या भयानक पार्श्वभूमीवर लिहिलेला आहे. महंमदांचे अनेक तरुण अनुयायी युद्धात कामी आले, विधवा व अनाथ बालकांची संख्या अतोनात वाढली. या कारणास्तव बहुविवाह प्रचलित झाला. विधवा व अनाथ बालकांच्या भरणपोषणाचा मार्ग म्हणून बहुविवाहप्रथा त्या काळी तर्कविसंगत नव्हती. शिवाय त्या सर्व असहाय स्त्रियांशी समभावाने वागण्याची मानवी अटही महंमदांनी जोडून ठेवली होती. तत्कालीन समाजाच्या पार्श्वभूमीवर ही वागणूक अनुदारपणाची ठरत नाही.

पण युगपरिवर्तन झाले. हे परिवर्तन अमान्य करणे हा अंधळेपणा होय. स्त्रियांसाठी स्वतंत्रपणे अर्थार्जन करण्याच्या संधी वाढत आहेत, आणखीही वाढतील. एका युगात काही विशेष गंभीर परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी केलेले हे विधान दुसऱ्या वेगळ्याच युगात हट्टिपणाने जसेच्या तसे राखून ठेवण्यात काही अर्थ आहे का? महंमदांच्या वाणीतील कोणत्या गोष्टी मूलभूत व शाश्वत स्वरूपाच्या आहेत, कोणत्या स्थळकाळनिष्ठ आहेत हा विचार न करून कसे चालेल? सामाजिक समतेलाच अग्रक्रम मिळायला हवा. स्त्री-पुरुषांच्या बाबतीत साम्य ठेवले गेले नाही, अजूनही ठेवले जात नाही, या वस्तुस्थितीत परिवर्तन होणे आवश्यक आहे. स्त्री-पुरुषांच्या संबंधांचे फक्त एक उदाहरण झाले. पण बाकीच्या बाबतीतही इस्लाम धर्माला व मुस्लिम समाजाला आतून ढवळून नव्याने विचार करण्याची प्रेरणा कोण देणार? हाच आजचा प्रमुख प्रश्न आहे.

यावाबतीत आजही माणसांच्या मनात फार द्विधाग्रस्तता दिसून येते. प्रतिक्रियाशील शक्तींचा आवाज व जोर जबरदस्त आहे यात नवल काहीच नाही; पण एकूण प्रकार फार दु:खदायक आहे. एक दिवस इस्लामचा दिग्विजय बघून सारे जग चकीत होऊन गेले होते. हेही एका विशिष्ट परिस्थितीत घडले. कारण त्या वेळी प्राचीन रोमन साम्राज्य कोसळून पडले होते. इराणचीही तीच अवस्था होती. परंपरागत खानदानी वंश विलासी वृत्तीने आळसलेले, अन्याय करण्यात निढावलेले व नेतृत्व देण्यास अयोग्य झाले होते. अशा काळात महंमदांच्या वाणीने एक नवीन आशा निर्माण केली. काही शतकांनंतर पुन्हा युगपरिवर्तन झाले. आता इस्लामची पीछेहाट व पाश्चात्त्य संस्कृतीची जोमदार अग्रगती सुरू झाली. हजार वर्षांच्या इतिहासात निरनिराळ्या काळी ख्रिश्चन व इस्लाम या दोन धर्मांमध्ये परस्परविरोधी संबंध निर्माण झाला. विरोध आणि पराजय यांचा सामना करीत औदार्य दाखवणे कोणत्याही देशाला फार कठीण जाते. इस्लामी जगातही धार्मिक कडवेपणाला कवटाळून ऐक्य राखण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण असे प्रयत्न अखेर निश्चितपणे व्यर्थ ठरणार असतात.

औदार्य दाखवण्याचा धोका पत्करूनच इस्लामला पुढे जावे लागणार आहे. संकुचिततेमुळे सर्वच हरवून जाईल. इस्लामच्या परंपरेतली माणुसकी, साम्य, तर्कप्रामाण्य, करुणा, या महाविश्वाप्रत कृतज्ञ विस्मय ही सारी श्रेष्ठ तत्त्वेही हरवून जातील.

त्याचबरोबर जागतिक उन्नतीची शक्यताही हरवून जाईल. स्वत:चे अर्थपूर्ण अस्तित्व राखण्यासाठी मुस्लिम समाजाला बुद्धी व विवेक जागृत ठेवून, इस्लामच्या अंतरंगातील शांती व शुभेच्छेचा प्रिय संदेश घेऊन पुन्हा एकदा युगांताच्या परिवर्तनशील मार्गावर चालावे लागेल. या मार्गावर जे पुढे जातील ते मार्गदर्शक ठरतील; पण त्यांना ताबडतोब सामाजिक मान्यता मिळेल अशी आशा न ठेवलेलीच बरी. कदाचित इक्बाल एका ठिकाणी म्हणतात तशीच तुच्छता व चेष्टा त्यांच्या वाट्याला येईल. इक्बाल म्हणतात, 'जहालपंथी सश्रद्ध लोक मला अश्रद्ध मानतात आणि अश्रद्ध लोकांच्या मते मी श्रद्धाळू'. तरीही मार्ग शेवटी हाच आहे. बुद्धी जागृत ठेवून चालणाऱ्या विवेकी माणसासाठी खरेच दुसरा काही मार्ग आहे का?

पूर्वीच्या दोन प्रमुख धर्मांमध्ये इस्लाम जास्त बुद्धिप्रामाण्यवादी होता हे आधीच सांगितले. याच धर्माला आज बुद्धी वा तर्काची भीती वाटते आहे. इस्लामला सहिष्णू व्हावे लागेल. क्षुल्लक कलहासाठी नव्हे तर एखाद्या वृहत् व महान उद्देश्यासाठी कार्यरत

(पान क्र. २३ वर)...

किंवा दाण्याचा एक दशसहस्रांश भाग जेव्हा (जमिनीवर) पडतो तेव्हा तो काही आवाज करतो का?' प्रोटॅगोरस म्हणाला, 'नाही'. मग झीनो म्हणाला, 'ज्वारीच्या दाण्यांचा एक शेर पडला तर तो आवाज करतो की नाही?' शेर आवाज करतो की, असे त्याने उत्तर दिल्यावर झीनो म्हणाला, 'पण मग ज्वारीच्या दाण्यांचा एक शेर आणि एक दाणा, किंवा दाण्याचा दशसहस्रांश भाग ह्यांचात काही प्रमाण असते की नाही?' त्याने अनुमती दिली. मग झीनो म्हणाला 'त्या आवाजात पण तसेच प्रमाण असणार की नाही? कारण, आवाजाचे जनक जसे असतात तसेच आवाजही असतात. आणि असे असेल तर, जर ज्वारीच्या दाण्यांचा एक शेर आवाज करीत असेल तर एक दाणा किंवा दाण्याचा दशसहस्रांश भागही आवाज करीत असणार'. हा झीनोचा युक्तिवाद होता.

[सिम्प्लिसिअस, भौतिकीवरील भाष्य ११०८.१४-२८]

(अपूर्ण)

... *(पान क्र. ६ वरून चालू)*

होण्यामुळेच कुठलाही धर्म किंवा मतवाद सार्थकी लागू शकतो. विश्वशांती प्रस्थापित करणे हेच आजचे प्रमुख काम आहे. शांती प्रस्थापित होईल का? संस्कृती टिकेल का? या प्रश्नांच्या संदर्भात इस्लामची भूमिका आज फार महत्त्वाची ठरणार आहे. या गतिमान विश्वातल्या सर्व महान तत्त्वांमध्ये एकप्रकारचे अंतर्द्वंद्व असते. महंमदांनी शांती व सहिष्णुतेचा हेतू मनात ठेवून युद्ध केले होते. इस्लाममधील अंतर्द्वंद्वाचे मूळ या ठिकाणी आहे. इतिहास बदलला, पण हे पुरातन अंतर्द्वंद्व अजूनही तितकेच प्रासंगिक आहे. इस्लामला विश्वशांतीचा पक्ष घेऊन वाणीच्या व कृतीच्या आधारे निर्भयपणे साक्ष द्यावी लागेल. तेव्हाच इस्लामची ऐतिहासिक भूमिका आजही सार्थकी लागेल. सर्व धर्मांच्या बाबतीत हीच गोष्ट लागू पडते. इस्लामच्या बाबतीतही.